नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी नगरोत्थान महाभियान राबविण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांक:- नगरो - २०२३/ प्र.क्र.३८९/ नवि-३३**

**मंत्रालय, मुंबई -४०००३२**

**दिनांक - २२ फेब्रुवारी, २०२४.**

**संदर्भ -:**

१. नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्र. एनयुआर-२००८/प्र.क्र.२०३/नवि-३३,दि. २०.०२.२०१०.
२. नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्र. नगरो-२०१४/ प्र.क्र. ११९ /नवि-३३, दि. २१.०८.२०१४.
३. नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/ प्र.क्र. ६१७ /नवि-३३, दि. ०४.०५.२०१८.
४. नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्र. नगरो-२०१७/प्र.क्र. ६१७(अ)/नवि-३३,दि. १७.१२.२०१८.
५. नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्र. नगरो-२०१९/ प्र.क्र. २४३ /नवि-३३, दि. १३.०९.२०१९.
६. नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/ प्र.क्र. २७३ /नवि-३३, दि. ११.१२.२०२०.
७. पा.पु.व स्व.विभागाचा शासन निर्णय क्र. ग्रापाधो-२०२१/ प्र.क्र.१२२/ पापु-०७, दि. २९.०६.२०२२.
८. नगर विकास विभागाचा शासन निर्णय क्र. अमृत-२०२२/ प्र.क्र. १४१ /नवि-३३, दि. १४.०७.२०२२.
९. नगर विकास विभागाचे शासन परिपत्रक क्र. अमृत-२०२२/प्र.क्र.२६९/नवि-३३, दि. १९.१०.२०२२
१०. नगर विकास विभागाचे शासन परिपत्रक क्र. नगरो-२०२३/प्र.क्र. २१३/नवि-३३, दि.१२.०४.२०२३.

**प्रस्तावना :-**

राज्यातील वाढत्या नागरीकरणाचा वेग लक्षात घेता केंद्र शासनाच्या जवाहलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत लहान व मध्यम शहरांकरिता पायाभूत सुविधा विकास योजनेच्या (UIDSSMT) धर्तीवर राज्य शासन महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान राबवित आहे. या योजनेंतर्गत ड वर्ग महानगरपालिका, सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींना पाणीपुरवठा, मलनि:स्सारण, पर्जन्य जल निचरा वाहिनी, नागरी दळणवळण व रस्ते विकास आणि सामाजिक सोयी व सुविधा इ. पायाभूत सुविधा विकासाच्या प्रकल्पांसाठी शासन भरीव अर्थसहाय्य करीत आहे. सन २०२१-२२ पासून राज्यात केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियान राबविण्यात येत आहे तथापि, राज्यातील विविध नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची पाणीपुरवठा व मलनि:स्सारण प्रकल्पांची मागणी अमृत २.० या अभियानांतर्गत उपलब्ध निधीतून भागविणे शक्य नाही. तसेच, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाची मुदत माहे ऑगस्ट, २०२४ मध्ये संपत आहे. त्यामुळे या योजनेचे पुनरावलोकन करून राज्यातील वाढत्या नागरी भागाच्या गरजा विचारात घेऊन या योजनेंतर्गत अ, ब व क वर्ग महापालिकांचा नव्याने समावेश करणे तसेच, योजनेच्या व्याप्तीमध्ये आणि वित्तीय आकृतीबंधात आवश्यक बदल करून ही योजना “नगरोत्थान महाभियान” या नावाने सुधारीत स्वरूपात राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्यादृष्टीने शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

**शासन निर्णय :-**

१. राज्यातील अ, ब, क व ड वर्ग महानगरपालिका तसेच सर्व नगरपरिषदा आणि नगरपंचायती क्षेत्रामध्ये माहे मार्च, २०३० पर्यंत “नगरोत्थान महाभियान” ही योजना राबविण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. नगरोत्थान महाभियानांतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रात त्यांच्या वर्गवारीनुसार पुढील बाबींचे प्रकल्प अनुज्ञेय राहतील :

<table>
<tr><th>अनुज्ञेय प्रकल्प</th><th>पात्र नागरी स्थानिक स्वराज्य संस्था</th></tr>
<tr><td>१. पाणी पुरवठा प्रकल्प<br>नवीन प्रकल्प, क्षमता वाढ व विस्तारीकरण प्रकल्प (Augmentation), प्रकल्पातील काही मुख्य उपांगे बदलणे, नळ जोडणी, स्काडा, नेट मीटरिंग इ.</td><td rowspan="5">अ, ब, क व ड वर्ग महानगरपालिका तसेच सर्व नगरपरिषदा आणि नगरपंचायती</td></tr>
<tr><td>२. मलनि:स्सारण प्रकल्प<br>नविन प्रकल्प, क्षमता वाढ व विस्तारीकरण प्रकल्प (Augmentation), मलनि:स्सारण जोडणी इ.</td></tr>
<tr><td>३. पर्जन्य जल निचरा वाहिनी</td></tr>
<tr><td>४. भूसंपादन<br>राष्ट्रीय महामार्गासाठी आवश्यक भूसंपदान, प्रमुख विमानतळ व प्रमुख रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याचे भूसंपादन.</td></tr>
<tr><td>५. रेल्वे ओव्हर ब्रिज</td></tr>
<tr><td>६. नागरी दळणवळण<br>रस्ते, पूल, उड्डाणपूल, रेल्वे ओव्हर ब्रिज इ.</td><td rowspan="3">ड वर्ग महानगरपालिका तसेच सर्व नगरपरिषदा आणि नगरपंचायती</td></tr>
<tr><td>७. सौर ऊर्जा उपांग<br>नवीन अथवा कार्यान्वित पाणीपुरवठा व मलनि:स्सारण प्रकल्पांमध्ये ऊर्जा बचतीसाठी नेट मीटरींग / ऑन ग्रीड / ग्रीड टाय प्रकारची सौर ऊर्जा निर्मीती</td></tr>
<tr><td>८. सामाजिक सोयी व सुविधांचा विकास</td></tr>
</table>

३. **वित्तीय आकृतीबंध :-**

अमृत २.० अभियानाच्या धर्तीवर नगरोत्थान महाभियानांतर्गत मंजूर होणाऱ्या प्रकल्पांसाठी एकूण प्रकल्प किंमतीपैकी राज्य शासनाचा व संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा पुढीलप्रमाणे राहील:

| अ.क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्था | राज्य शासन हिस्सा | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा |
|---|---|---|---|
| १ | अ व ब वर्ग महानगरपालिका | ५०% | ५०% |
| २ | क व ड वर्ग महानगरपालिका | ७०% | ३०% |
| ३ | अ वर्ग नगरपरिषद | ८५% | १५% |
| ४ | ब वर्ग नगरपरिषद | ९०% | १०% |
| ५ | क वर्ग नगरपरिषद/नगरपंचायत | ९५% | ०५% |

४. नगरोत्थान महाअभियानामध्ये प्रथम प्राधान्य पाणीपुरवठा प्रकल्पांना देण्यात येईल व त्यानंतर मलनि:स्सारण, नागरी दळणवळण व अन्य प्रकल्पांचा विचार करण्यात येईल.

४.१.**पाणी पुरवठा :-** प्रकल्प मंजूर करताना, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी प्रथम नियमित पाणी पुरवठ्याबाबतचे प्रकल्प हाती घेणे अपेक्षीत राहील. पाणी पुरवठ्याचे प्रकल्प मंजूर करतांना नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची लोकसंख्या, पाणी वितरण व्यवस्थेची व्याप्ती, प्राप्त पाणी आरक्षण, प्रस्तावातील उपांगांच्या जागांची मालकी इ. बाबींच्या आधारे मंजुरी देण्यात येईल.

४.२.**मलनि:स्सारण :-** ज्या शहरात मलशुध्दीकरण केंद्र व मलनि:स्सारण व्यवस्था अस्तित्वात नाही, अशा शहरांना मलनि:स्सारण प्रकल्प राबविण्याबाबत प्राधान्य देण्यात येईल. तथापि, या शहरांमध्ये १३५ एलपीसीडी पाणी पुरवठा नियमितपणे उपलब्ध असणे अनिवार्य राहिल.

४.३.**नागरी दळणवळण व भूसंपादन :-** नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा आवश्यकतेनुसार नागरी दळणवळण साधनांच्या विकासाचे प्रकल्प (रस्ते, पूल, उड्डाणपूल, रेल्वे ओव्हर ब्रिज इ.) मंजूर केले जातील. रेल्वे ओव्हर ब्रिज प्रकल्पाच्या अनुषंगाने आवश्यक भूसंपादनासाठी या योजनेतून निधी अनुज्ञेय असणार नाही, भूसंपादनासाठी आवश्यक निधी उभारण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची राहील तथापि, राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांसाठी नागरी स्थानिक स्वराज्य क्षेत्रातील आवश्यक भूसंपादनासाठी या योजनेतून निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

४.४.**पर्जन्य जल निचरा वाहिनी :-** नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आवश्कतेनुसार पर्जन्य जल निचरा वाहिनीचे प्रकल्प मंजूर करण्यात येतील.

४.५.**सामाजिक सोयी व सुविधांचा विकासः-** नागरी भागात विहित मानकानुसार व विकास आराखडयानुसार समाविष्ट असलेल्या सामाजिक सोयी व सुविधांचा विकास करण्याबाबतचे प्रकल्प मंजूर केले जातील.

४.६.**सौर ऊर्जा उपांग :-** नगरपरिषद / नगरपंचायतीच्या प्रस्तावित करण्यात येणाऱ्या अथवा सध्या कार्यान्वित असलेल्या पाणीपुरवठा व मलनि:स्सारण प्रकल्पांमध्ये ऊर्जा बचतीसाठी सौर ऊर्जा निर्मिती उपांगाचा समावेश करावयाचा असल्यास सदर सौर ऊर्जा निर्मिती ही नेट मीटरिंग (Net Metering) / ऑन ग्रीड (On Grid) / ग्रीड टाय ( Grid-Tie) प्रकारची असणे बंधनकारक राहील.

५. नगरोत्थान महाभियानांतर्गत मंजूर प्रकल्पांच्या किंमतीमध्ये तांत्रिक मान्यतेसाठी द्यावयाचे शुल्क तसेच, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्कांचा समावेश करण्यात यावा. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थांची वर्गवारी निश्चित केली आहे तसेच, प्रकल्पाच्या किंमतीवर आधारित टेलिस्कोपिक (Telescopic) पध्दतीने प्रकल्प व्यवस्थापन शुल्काची मर्यादा निश्चित केली असून अमृत २.० अभियानाच्या धर्तीवर या योजनेसाठी देखील प्रकल्प व्यवस्थापन शुल्काची सदर मर्यादा लागू करण्यात येत आहे. त्यानुसार, नगरोत्थान महाभियानांतर्गत मंजूर करण्यात येणाऱ्या रुपये ५ कोटी पर्यंतच्या प्रकल्पांसाठी ३ % ते रुपये १०५० कोटी पर्यंतच्या प्रकल्पांसाठी ०.५६ % प्रकल्प व्यवस्थापन शुल्क अनुज्ञेय राहील, प्रकल्पाच्या किंमतीनुसार व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेच्या वर्गवारीनुसार

अनुज्ञेय असलेल्या प्रकल्प व्यवस्थापन शुल्काचा तपशील या शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट अ मध्ये नमूद केला आहे.

६. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने पाणीपुरवठा व मलनि:स्सारण प्रकल्पांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नामिका सूची (Empanelment) सुध्दा अंतिम केलेली आहे, सदर नामिका सूची व प्रकल्प व्यवस्थापन शुल्क या विभागाकडून स्वीकारण्यात येईल व त्याबाबतचे आदेश या विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येतील.

७. नगरोत्थान महाअभियानाच्या अंमलबजावणीसाठी नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई यांना राज्यस्तरीय समन्वय यंत्रणा म्हणून नियुक्त करण्यात येत आहे. या अभियानांतर्गत प्रशासकीय खर्चासाठी अर्थसंकल्पिय तरतुदीच्या ०.०५ टक्के निधी विनियोगात आणण्यास मंजूरी देण्यात येत आहे. सदर निधी नगरोत्थान महाभियानाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक कंत्राटी मनुष्यबळ वापरणे, आवश्यक संगणक, स्टेशनरी इ.साठी वापरता येईल. तथापि, सदर निधी भांडवली खर्चासाठी, गाडी खरेदीसाठी वापरता येणार नाही. तथापि, क्षेत्र भेटीवेळी आवश्यक असल्यास भाडेतत्त्वावर क्षेत्र भेटीसाठी गाडी उपयोगात आणण्यासाठी या निधीचा वापर करता येईल. सदर प्रकल्पांच्या किंमतीमध्ये प्रशासकीय खर्चासाठीचे शुल्क समाविष्ट करण्यात यावे.

८. नगरोत्थान महाअभियानांतर्गत मंजूर होणाऱ्या पाणीपुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पांसाठी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचा दिनांक २९ जून, २०२२ रोजीचा शासन निर्णय लागू राहील तथापि, या शासन निर्णयानुसार आवश्यक वाढीव निधी उभारण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची राहील, त्याकरिता राज्य शासनामार्फत कोणतेही वाढीव अनुदान उपलब्ध केले जाणार नाही.

९. **प्रकल्प मंजुरीची कार्यपध्दती :-**

९.१. नगरोत्थान महाभियानांतर्गत विहित केलेल्या सर्व अटी व शर्तीचे पालन करण्याबाबत, सुधारणा राबविण्याबाबत, स्वहिश्श्याचा निधी विहित वेळेत उभारण्याबाबत तसेच सदर प्रकल्प यशस्वीरित्या व जबाबदारीने राबविण्याबाबत संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने ठराव करणे बंधनकारक राहील. या अटींची पूर्तता केल्यानंतरच प्रकल्प मान्यतेबाबतचा प्रस्ताव विचारात घेतला जाईल.

९.२. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी खालील घटकांचे प्रकल्प अहवालांना संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक राहील. जसे:-

i. नागरी दळणवळण व त्या संबंधित निगडीत बाबी, रेल्वे ओव्हर ब्रिज, सामाजिक सोयी सुविधा विकास:- सक्षम प्राधिकारी: सार्वजनिक बांधकाम विभाग

ii. मलनि:स्सारण, पाणी पुरवठा व पर्जन्य जलवाहीनी सक्षम प्राधिकारी :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

iii. भूसंपादन: नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रामधून जाणारे राष्ट्रीय महामार्ग तसेच प्रमुख रेल्वे स्थानक व विमानतळाकडे जाणाऱ्या प्रमुख रस्त्यांच्या रुंदीकरणासाठी आवश्यक भूसंपादन TDR देऊन करावे व ते शक्य होत नसल्यास तसे जिल्हाधिकाऱ्यांनी प्रमाणित केल्यानंतर भूसंपादनासाठी या योजनेतून निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. भूसंपादनाच्या

प्रस्तावाची छाननी व मोबदल्याची परिगणना राज्य शासनाच्या प्रचलित धोरणानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी करावी. त्यानंतर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने नगरपरिषद प्रशासन संचालनालयास सदर प्रस्ताव सादर करावा. भूसंपादनासाठी केवळ अधिकृत मालमत्ता धारकांचाच विचार करावा आणि अनधिकृत ताबा असलेल्या अतिक्रमित धारकांच्या पुनर्वसनासाठी द्यावयाच्या मोबदल्या संदर्भात प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०४ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठित केलेल्या समितीच्या अहवालाच्या आधारे घेण्यात येणाऱ्या निर्णयानुसार स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात यावी.

९.३. तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यावर संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने सदर सविस्तर प्रकल्प अहवाल, वास्तवदर्शी वित्तीय आराखड्यासह (Financial Closure सह) राज्यस्तरीय समन्वय यंत्रणेकडे सादर करणे आवश्यक राहील. समन्वय यंत्रणेने सदर प्रस्तावाची तांत्रिक व प्रशासकीय छाननी करून पात्र प्रस्ताव शासनास सादर करणे आवश्यक राहील.

९.४. शासनाकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावास प्रथम अभियानाच्या राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समितीमार्फत मान्यता दिली जाईल. प्रकल्पास मंजुरी देतांना समितीने मान्यता दिल्यानंतर शासनामार्फत प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येईल. नगरोत्थान महाभियानांतर्गत प्रकल्पांना मान्यता प्रदान करण्यासाठी खालीलप्रमाणे राज्यस्तरीय प्रकल्प मान्यता समिती गठीत करण्यात येत आहे:-

| अ. क्र. | समिती सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | प्रधान सचिव (नगर विकास-२) | अध्यक्ष |
| २. | प्रधान सचिव (नवि-१) किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेला उप सचिव पेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी | सदस्य |
| ३. | प्रधान सचिव (वित्त) किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेला उप सचिव पेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी | सदस्य |
| ४. | प्रधान सचिव (नियोजन) किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेला उप सचिव पेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी | सदस्य |
| ५. | प्रधान सचिव (पाणीपुरवठा) किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेला उप सचिव पेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी | सदस्य |
| ६. | प्रधान सचिव (सार्वजनिक बांधकाम विभाग) किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेला उप सचिव पेक्षा कमी दर्जा नसलेला अधिकारी | सदस्य |
| ७. | सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेला तांत्रिक संवर्गातील अधिकारी | सदस्य |
| ८. | आवश्यक असल्यास संबंधित क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती / अधिकारी | निमंत्रित सदस्य |
| ९. | आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई. | सदस्य |

सदर समितीची कार्यकक्षा अमृत २.० अभियानाच्या राज्यस्तरीय तांत्रिक मान्यता समितीच्या धर्तीवर प्रकल्प मंजूरी, तांत्रिक मंजूरी, निविदा मसुदयास मंजूरी देणे व निविदा प्रक्रियेनंतर पात्र निविदा स्वीकृतीस मंजूरी देणे तसेच मंजूर प्रकल्पांचे नियमीत संनियंत्रण करणे इ. राहिल.

१०. **निधी वितरणाची कार्यपद्धती :-**

१०.१. मंजूर प्रकल्पांतील शासन हिश्याची रक्कम अनुदान स्वरूपात एकूण ३ हप्त्यात वितरीत करण्यात येईल, सदर रक्कम व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या स्वहिश्याची रक्कम शासनाच्या प्रचलित धोरणानुसार विहीत केलेल्या बँकांमध्ये स्वतंत्र खाते उघडून ठेवणे अनिवार्य राहील.

१०.२. प्रकल्प मंजूरीनंतर नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने विहित कार्यपध्दतीनुसार निविदा प्रक्रिया राबवून कार्यादेश निर्गमित करुन शासनाकडे प्रथम हप्त्याच्या निधी मागणीचा प्रस्ताव सादर केल्यानंतर प्रथम हप्त्याचा निधी वितरीत करण्यात येईल.

१०.३. शासनाने वितरीत केलेल्या हप्त्याची रक्कम व त्या प्रमाणात नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या हिश्याची रक्कम अशा एकूण रकमेच्या ७५ % खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत शासनास सादर केल्यानंतर पुढील हप्त्याचा निधी वितरीत करण्यात येईल.

१०.४. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी दुसऱ्या व तिसऱ्या हप्त्याचा निधी मागणी प्रस्ताव नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत शासनास सादर करावा. नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी प्रस्तावांची छाननी करून उचित अभिप्रायांसह शासनास प्रस्ताव द्यावा.

११. या अभियानांतर्गत प्रकल्प मंजुरीकरिता नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना खाली दर्शविलेल्या सुधारणा राबविणे आवश्यक राहिल.

i. विभागाने विकसित केलेल्या महायुलबी प्रणालीचा अंगीकार करून अथवा सदर प्रणालीशी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सध्या वापरात असलेल्या संगणकीय प्रणालीचे एकात्मिकिकरण (Integration) करून त्यांच्या कामकाजाचे पूर्ण संगणकीकरण करणे अनिवार्य राहील. यात प्रामुख्याने ई-गव्हर्नन्स, लेखा, जन्म- मृत्यु नोंद सुधारण्याची १०० % अंमलबजावणी करणे इ. बाबी बंधनकारक राहतील.

ii. उचित वापरकर्ता शुल्क लागू करून किमान एकूण मागणीच्या ८० % वसुली करणे.

iii. नागरी क्षेत्रातील गरिबांसाठी अर्थसंकल्पात विवक्षित निधीची तरतूद करणे.

iv. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने त्यांच्या कार्यक्षेत्रातील घन व ओल्या कचऱ्याचे व्यवस्थापन उचितरित्या करणे बंधनकारक राहील.

v. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी कार्यक्षेत्रातील सर्व इमारतीसाठी पर्जन्य जल पुनर्भरण करावे.

१२. अमृत २.० अभियानांतर्गत पाणीपुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पांसाठी संदर्भाधीन दिनांक १९ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये आदर्श निविदा पुस्तिका (Model DTP) प्रसिद्ध केली असून त्यानुसार अथवा त्यात वेळोवेळी केल्या जाणाऱ्या सुधारणानुसार नगरोत्थान महाभियानांतर्गत देखील निविदा प्रक्रिया राबविणे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस बंधनकारक राहील.

१३. **नगरोत्थान महाभियानाची समन्वय यंत्रणा:-**

आयुक्त तथा संचालक, नगर परिषद प्रशासन संचालनालय हे अभियानासाठी राज्यस्तरीय समन्वय यंत्रणा म्हणून काम पाहतील, त्यानुसार त्यांनी खालील बाबी हाताळणे आवश्यक राहील:

१३.१. नगरोत्थान महाभियानांतर्गत पर्यवेक्षीय व समन्वयीन संस्था म्हणून काम पाहणे तसेच, मंजूर प्रकल्पांचे संनियंत्रण करणे व सदर प्रकल्प विहीत वेळेत व सुनियोजितरीत्या पूर्ण करण्यासाठी नियमित मासिक आढावा घेऊन त्याचा अहवाल शासनास सादर करणे.

१३.२. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडून नगरोत्थान महाभियानांतर्गत विहीत सुधारणांची अंमलबजावणी होत असल्याबबत पर्यवेक्षण करणे.

१३.३. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून सविस्तर प्रकल्प अहवालांची तांत्रिक तपासणी करून प्रशासकिय मान्यतेसाठी शासनाकडे सादर करणे, नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना वेळोवेळी मार्गदर्शन करणे इत्यादी.

१३.४. नगरोत्थान महाभियानांतर्गत शासनामार्फत मंजूर प्रकल्पांसाठी वितरीत केलेल्या निधीच्या विनियोगाबाबत संनियंत्रण व समन्वय करणे.

१३.५. मंजूर प्रकल्पांच्या प्रगतीप्रमाणे खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडून वेळोवेळी प्राप्त करून घेवून संचालनालयाच्या स्तरावर योग्य प्रकारे जतन करून याबाबत शासनास अहवाल सादर करण्याची जबाबदारी राज्यस्तरीय समन्वय यंत्रणेची राहील.

१३.६. मंजूर प्रकल्पांकरीता दुसऱ्या व त्यापुढील सर्व हप्त्याच्या निधीची मागणी करण्याचे प्रस्ताव नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडून प्राप्त करून आवश्यक छाननी करून शासनास सादर करणे.

१३.७. पूर्ण झालेल्या प्रकल्पांचे प्रकल्प पूर्णत्व प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे.

१४. **प्रकल्पांचे त्रयस्थ तांत्रिक परिक्षण:-**

नगरोत्थान महाभियानातंर्गत मंजूर प्रकल्पांच्या अंमलबजावणीच्या विविध टप्प्यावर वेळोवेळी शासकीय / निमशासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाकडून त्रयस्थ तांत्रिक परिक्षण संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने स्वनिधीतून करून घेणे बंधनकारक राहिल. तसेच, प्रकल्पांतर्गत पुढील हप्त्याचा निधी मागणीचा प्रस्ताव सादर करतेवेळी त्रयस्थ तांत्रिक परिक्षणाचे गुणवत्तेबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

१५. **नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने स्वहिश्याचा निधी भरण्याकरिता कर्ज उभारणी :-**

नगरोत्थान महाभियानांतर्गत मंजूर प्रकल्पांसाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वहिश्याचा निधी उभारण्यासाठी राष्ट्रीयीकृत बँकांकडून, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए), महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कंपनी मर्यादीत (एमयूआयडीसीएल) अथवा केंद्र वा राज्य शासनमान्य वित्तिय संस्थांकडून कर्ज घेण्याची मुभा राहील, त्यासाठी शासनाची परवानगी घेण्यात यावी. त्याकरिता संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने कर्ज घेण्याचा प्रस्ताव राज्य स्तरीय समन्वय संस्थेमार्फत शासनाकडे सादर करावा.

१६. नगरोत्थान महाभियानांतर्गत दर वर्षी आवश्यक तरतूद खालील लेखाशीर्षाखाली करण्यात यावी.

| महानगरपालिका | नगरपरिषद / नगरपंचायत |
|---|---|
| मागणी क्र. एफ-२,<br>२२१७ नगर विकास<br>८० सर्वसाधारण<br>१९१ महानगरपालिकांना सहाय्य,<br>(००) (५७) नगरोत्थान महाभियानांतर्गत महानगरपालिकांसाठी सहायक अनुदान (२२१७८०२१) (कार्यक्रम)<br>३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) | मागणी क्र. एफ-२.<br>२२१७ नगर विकास<br>८० सर्वसाधारण<br>१९२ नगरपरिषदांना सहाय्य,<br>(००) (६१) नगरोत्थान महाभियानांतर्गत राज्यातील नगरपरिषद / नगर पंचायतीना सहायक अनुदान (२२१७८१२८) (कार्यक्रम)<br>३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) |

१७. **नगरोत्थान महाभियानांतर्गत मंजूर प्रकल्पांची देखभाल व दुरूस्ती :-**
नगरोत्थान महाभियानांतर्गत मंजूर प्रकल्प पूर्णत्वास गेल्यानंतर सदर योजनेची देखभाल व दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची राहील, योजनेच्या देखभाल व दुरुस्तीसाठी कोणताही निधी शासनाकडून प्राप्त होणार नाही.

१८. राज्य स्तरीय सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाच्या धोरणात्मक बाबींशी निगडीत यापूर्वी निर्गमित केलेले सर्व शासन निर्णय अधिक्रमीत करून सदर शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

१९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२४०२२२१७५४२१०८२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRIKANT CHANDRAKANT ANDGE

Digitally signed by SHRIKANT CHANDRAKANT ANDGE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=5d5ab93b4e4f2fcd87e12fe19b8965025d482b1bee0fffaa62085c34db6bfd8c, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=D8D9626C9E038380CD235C048F20D7CE74CFFD3A95F2AC3C192E9C991F358271, cn=SHRIKANT CHANDRAKANT ANDGE
Date: 2024.02.23 21:01:20 +05'30'

**(श्रीकांत आंडगे)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उप मुख्यमंत्री महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, नगर विकास विभाग -१ (नवि-१), मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, मुंबई.

९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता )-२, नागपूर.
१०.प्रधान सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
११.प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
१२.विभागीय आयुक्त सर्व.
१३.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई.
१४.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
१५.जिल्हाधिकारी सर्व.
१६.आयुक्त, सर्व महानगरपालिका.
१७.मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषद/नगरपंचायत.
१८. कक्ष अधिकारी (नवि-०४), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९.निवड नस्ती, नवि-३३.

## परिशिष्ट - अ

### नगरोत्थान महाभियानांतर्गत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेच्या वर्गवारी व प्रकल्प किंमतीनुसार अनुज्ञेय प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) शुल्काचा तपशील

(खालील दर हे वस्तु व सेवा कर आणि इतर करांच्या समवेशासह नमूद केले आहेत)

| अ. क्र. | प्रकल्प किंमत (रु. कोटी) | अनुज्ञेय प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क (%) | अनुज्ञेय प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क रक्कम (रु. लक्ष) |
|---|---|---|---|
| वर्ग १ साठी प्रकल्प किंमत रु. ५ कोटी ते रु. ७५ कोटी पर्यंत | | | |
| १ | ५ | ३.०० % | १५.०० |
| २ | १० | २.९० % | २९.०० |
| ३ | १५ | २.७० % | ४०.४४ |
| ४ | २० | २.४३ % | ४८.६४ |
| ५ | २५ | २.२७ % | ५६.८४ |
| ६ | ३० | २.१७ % | ६५.०४ |
| ७ | ३५ | २.०९ % | ७३.२४ |
| ८ | ४० | २.०४ % | ८१.४३ |
| ९ | ४५ | १.९१ % | ८५.९१ |
| १० | ५० | १.८१ % | ९०.३९ |
| ११ | ५५ | १.७२ % | ९४.८७ |
| १२ | ६० | १.६६ % | ९९.३५ |
| १३ | ६५ | १.६० % | १०३.८४ |
| १४ | ७० | १.५५ % | १०८.३२ |
| १५ | ७५ | १.५० % | ११२.८० |
| वर्ग २ साठी प्रकल्प किंमत रु. ७५ कोटी पेक्षा अधिक ते रु. २०० कोटी पर्यंत | | | |
| १ | ८० | १.४७ % | ११७.२८ |
| २ | ८५ | १.४३ % | १२१.७६ |
| ३ | ९० | १.४७ % | १३२.४० |
| ४ | ९५ | १.४४ % | १३६.३४ |
| ५ | १०० | १.४० % | १४०.२८ |
| ६ | १०५ | १.३७ % | १४४.२२ |
| ७ | ११० | १.३५ % | १४८.१६ |
| ८ | ११५ | १.३२ % | १५२.१० |
| ९ | १२० | १.३० % | १५६.०४ |
| १० | १२५ | १.२८ % | १५९.९८ |
| ११ | १३० | १.२६ % | १६३.९२ |
| १२ | १३५ | १.२४ % | १६७.८६ |
| १३ | १४० | १.२३ % | १७१.८० |
| १४ | १४५ | १.२१ % | १७५.७४ |

| अ. क्र. | प्रकल्प किंमत (रु. कोटी) | अनुज्ञेय प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क (%) | अनुज्ञेय प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क रक्कम (रु. लक्ष) |
|---|---|---|---|
| १५ | १५० | १.२० % | १७९.६६ |
| १६ | १५५ | १.१८ % | १८३.३६ |
| १७ | १६० | १.१७ % | १८७.०६ |
| १८ | १६५ | १.१६ % | १९०.७६ |
| १९ | १७० | १.१४ % | १९४.४६ |
| २० | १७५ | १.१३ % | १९८.१६ |
| २१ | १८० | १.१२ % | २०१.८६ |
| २२ | १८५ | १.११ % | २०५.५६ |
| २३ | १९० | १.१० % | २०९.२६ |
| २४ | १९५ | १.०९ % | २१२.९६ |
| २५ | २०० | १.०८ % | २१६.६६ |
| वर्ग ३ साठी प्रकल्प किंमत रु. २०० कोटी पेक्षा अधिक | | | |
| १ | २०५ | १.०७ % | २२०.३६ |
| २ | २१० | १.०७ % | २२४.०६ |
| ३ | २१५ | १.०६ % | २२७.७६ |
| ४ | २२० | १.०५ % | २३१.४६ |
| ५ | २२५ | १.०५ % | २३५.१६ |
| ६ | २३० | १.०४ % | २३८.८६ |
| ७ | २३५ | १.०३ % | २४२.५६ |
| ८ | २४० | १.०३ % | २४६.२६ |
| ९ | २४५ | १.०२ % | २४९.९६ |
| १० | २५० | १.०१ % | २५३.६३ |
| ११ | २५५ | १.०० % | २५६.११ |
| १२ | २६० | ०.९९ % | २५८.५९ |
| १३ | २६५ | ०.९९ % | २६१.०७ |
| १४ | २७० | ०.९८ % | २६३.५५ |
| १५ | २७५ | ०.९७ % | २६६.०३ |
| १६ | २८० | ०.९६ % | २६८.५१ |
| १७ | २८५ | ०.९५ % | २७०.९९ |
| १८ | २९० | ०.९४ % | २७३.४७ |
| १९ | २९५ | ०.९४ % | २७५.९५ |
| २० | ३०० | ०.९३ % | २७८.४३ |
| २१ | ३०५ | ०.९२ % | २८०.९१ |
| २२ | ३१० | ०.९१ % | २८३.३९ |
| २३ | ३१५ | ०.९१ % | २८५.८७ |

| अ. क्र. | प्रकल्प किंमत (रु. कोटी) | अनुज्ञेय प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क (%) | अनुज्ञेय प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क रक्कम (रु. लक्ष) |
|---|---|---|---|
| २४ | ३२० | ०.९० % | २८८.३५ |
| २५ | ३२५ | ०.८९ % | २९०.८३ |
| २६ | ३३० | ०.८९ % | २९३.३१ |
| २७ | ३३५ | ०.८८ % | २९५.७९ |
| २८ | ३४० | ०.८८ % | २९८.२७ |
| २९ | ३४५ | ०.८७ % | ३००.७५ |
| ३० | ३५० | ०.८७ % | ३०३.३२ |
| ३१ | ३५५ | ०.८६ % | ३०५.८२ |
| ३२ | ३६० | ०.८६ % | ३०८.३२ |
| ३३ | ३६५ | ०.८५ % | ३१०.८२ |
| ३४ | ३७० | ०.८५ % | ३१३.३२ |
| ३५ | ३७५ | ०.८४ % | ३१५.८२ |
| ३६ | ३८० | ०.८४ % | ३१८.३२ |
| ३७ | ३८५ | ०.८३ % | ३२०.८२ |
| ३८ | ३९० | ०.८३ % | ३२३.३२ |
| ३९ | ३९५ | ०.८२ % | ३२५.८२ |
| ४० | ४०० | ०.८२ % | ३२८.३२ |
| ४१ | ४०५ | ०.८२ % | ३३०.८२ |
| ४२ | ४१० | ०.८१ % | ३३३.३२ |
| ४३ | ४१५ | ०.८१ % | ३३५.८२ |
| ४४ | ४२० | ०.८१ % | ३३८.३२ |
| ४५ | ४२५ | ०.८० % | ३४०.८२ |
| ४६ | ४३० | ०.८० % | ३४३.३२ |
| ४७ | ४३५ | ०.७९ % | ३४५.८२ |
| ४८ | ४४० | ०.७९ % | ३४८.३२ |
| ४९ | ४४५ | ०.७९ % | ३५०.८२ |
| ५० | ४५० | ०.७९ % | ३५३.३० |
| ५१ | ४५५ | ०.७८ % | ३५५.८० |
| ५२ | ४६० | ०.७८ % | ३५८.३० |
| ५३ | ४६५ | ०.७८ % | ३६०.८० |
| ५४ | ४७० | ०.७७ % | ३६३.३० |
| ५५ | ४७५ | ०.७७ % | ३६५.८० |
| ५६ | ४८० | ०.७७ % | ३६८.३० |
| ५७ | ४८५ | ०.७६ % | ३७०.८० |
| ५८ | ४९० | ०.७६ % | ३७३.३० |

| अ. क्र. | प्रकल्प किंमत (रु. कोटी) | अनुज्ञेय प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क (%) | अनुज्ञेय प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क रक्कम (रु. लक्ष) |
|---|---|---|---|
| ५९ | ४९५ | ०.७६ % | ३७५.८० |
| ६० | ५०० | ०.७६ % | ३७८.३० |
| ६१ | ५०५ | ०.७५ % | ३७९.८५ |
| ६२ | ५१० | ०.७५ % | ३८१.४० |
| ६३ | ५१५ | ०.७४ % | ३८२.९५ |
| ६४ | ५२० | ०.७४ % | ३८४.५० |
| ६५ | ५२५ | ०.७४ % | ३८६.०५ |
| ६६ | ५३० | ०.७३ % | ३८७.६० |
| ६७ | ५३५ | ०.७३ % | ३८९.१५ |
| ६८ | ५४० | ०.७२ % | ३९०.७० |
| ६९ | ५४५ | ०.७२ % | ३९२.२४ |
| ७० | ५५० | ०.७१ % | ३९२.२८ |
| ७१ | ५५५ | ०.७१ % | ३९४.५५ |
| ७२ | ५६० | ०.७१ % | ३९६.८२ |
| ७३ | ५६५ | ०.७१ % | ३९९.०८ |
| ७४ | ५७० | ०.७० % | ४०१.३५ |
| ७५ | ५७५ | ०.७० % | ४०३.६२ |
| ७६ | ५८० | ०.७० % | ४०५.८९ |
| ७७ | ५८५ | ०.७० % | ४०८.१५ |
| ७८ | ५९० | ०.७० % | ४१०.४२ |
| ७९ | ५९५ | ०.६९ % | ४१२.६९ |
| ८० | ६०० | ०.६९ % | ४१४.९६ |
| ८१ | ६०५ | ०.६९ % | ४१७.२२ |
| ८२ | ६१० | ०.६९ % | ४१९.४९ |
| ८३ | ६१५ | ०.६९ % | ४२१.७६ |
| ८४ | ६२० | ०.६८ % | ४२४.०३ |
| ८५ | ६२५ | ०.६८ % | ४२६.२९ |
| ८६ | ६३० | ०.६८ % | ४२८.५६ |
| ८७ | ६३५ | ०.६८ % | ४३०.८३ |
| ८८ | ६४० | ०.६८ % | ४३३.१० |
| ८९ | ६४५ | ०.६७ % | ४३५.३६ |
| ९० | ६५० | ०.६७ % | ४३७.६३ |
| ९१ | ६५५ | ०.६७ % | ४३९.९० |
| ९२ | ६६० | ०.६७ % | ४४२.१७ |
| ९३ | ६६५ | ०.६७ % | ४४४.४३ |

| अ. क्र. | प्रकल्प किंमत (रु. कोटी) | अनुज्ञेय प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क (%) | अनुज्ञेय प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क रक्कम (रु. लक्ष) |
|---|---|---|---|
| ९४ | ६७० | ०.६७ % | ४४६.७० |
| ९५ | ६७५ | ०.६७ % | ४४८.९७ |
| ९६ | ६८० | ०.६६ % | ४५१.२४ |
| ९७ | ६८५ | ०.६६ % | ४५३.५० |
| ९८ | ६९० | ०.६६ % | ४५५.७७ |
| ९९ | ६९५ | ०.६६ % | ४५८.०४ |
| १०० | ७०० | ०.६६ % | ४६०.३१ |
| १०१ | ७०५ | ०.६६ % | ४६२.५७ |
| १०२ | ७१० | ०.६५ % | ४६४.८४ |
| १०३ | ७१५ | ०.६५ % | ४६७.११ |
| १०४ | ७२० | ०.६५ % | ४६९.३८ |
| १०५ | ७२५ | ०.६५ % | ४७१.६४ |
| १०६ | ७३० | ०.६५ % | ४७३.९१ |
| १०७ | ७३५ | ०.६५ % | ४७६.१८ |
| १०८ | ७४० | ०.६५ % | ४७८.४५ |
| १०९ | ७४५ | ०.६५ % | ४८०.७१ |
| ११० | ७५० | ०.६४ % | ४८२.९८ |
| १११ | ७५५ | ०.६४ % | ४८५.१० |
| ११२ | ७६० | ०.६४ % | ४८७.२३ |
| ११३ | ७६५ | ०.६४ % | ४८९.३५ |
| ११४ | ७७० | ०.६४ % | ४९१.४८ |
| ११५ | ७७५ | ०.६४ % | ४९३.६० |
| ११६ | ७८० | ०.६४ % | ४९५.७३ |
| ११७ | ७८५ | ०.६३ % | ४९७.८५ |
| ११८ | ७९० | ०.६३ % | ४९९.९८ |
| ११९ | ७९५ | ०.६३ % | ५०२.१० |
| १२० | ८०० | ०.६३ % | ५०४.२२३ |
| १२१ | ८०५ | ०.६३ % | ५०६.३५ |
| १२२ | ८१० | ०.६३ % | ५०८.४७ |
| १२३ | ८१५ | ०.६३ % | ५१०.६० |
| १२४ | ८२० | ०.६३ % | ५१२.७२ |
| १२५ | ८२५ | ०.६२ % | ५१४.८५ |
| १२६ | ८३० | ०.६२ % | ५१६.९७ |
| १२७ | ८३५ | ०.६२ % | ५१९.१० |
| १२८ | ८४० | ०.६२ % | ५२१.२२ |

| अ. क्र. | प्रकल्प किंमत (रु. कोटी) | अनुज्ञेय प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क (%) | अनुज्ञेय प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क रक्कम (रु. लक्ष) |
|---|---|---|---|
| १२९ | ८४५ | ०.६२ % | ५२३.३५ |
| १३० | ८५० | ०.६२ % | ५२५.४७ |
| १३१ | ८५५ | ०.६२ % | ५२७.१२ |
| १३२ | ८६० | ०.६१ % | ५२८.७८ |
| १३३ | ८६५ | ०.६१ % | ५३०.४३ |
| १३४ | ८७० | ०.६१ % | ५३२.०८ |
| १३५ | ८७५ | ०.६१ % | ५३३.७४ |
| १३६ | ८८० | ०.६१ % | ५३५.३९ |
| १३७ | ८८५ | ०.६१ % | ५३७.०४ |
| १३८ | ८९० | ०.६१ % | ५३८.६९ |
| १३९ | ८९५ | ०.६० % | ५४०.३५ |
| १४० | ९०० | ०.६० % | ५४२.०० |
| १४१ | ९०५ | ०.६० % | ५४३.६५ |
| १४२ | ९१० | ०.६० % | ५४५.३१ |
| १४३ | ९१५ | ०.६० % | ५४६.९६ |
| १४४ | ९२० | ०.६० % | ५४८.६१ |
| १४५ | ९२५ | ०.५९ % | ५५०.२७ |
| १४६ | ९३० | ०.५९ % | ५५१.९२ |
| १४७ | ९३५ | ०.५९ % | ५५३.५७ |
| १४८ | ९४० | ०.५९ % | ५५५.२२ |
| १४९ | ९४५ | ०.५९ % | ५५६.८८ |
| १५० | ९५० | ०.५९ % | ५५८.५३ |
| १५१ | ९५५ | ०.५९ % | ५६०.२२ |
| १५२ | ९६० | ०.५९ % | ५६१.९१ |
| १५३ | ९६५ | ०.५८ % | ५६३.६० |
| १५४ | ९७० | ०.५८ % | ५६५.३० |
| १५५ | ९७५ | ०.५८ % | ५६६.९९ |
| १५६ | ९८० | ०.५८ % | ५६८.६८ |
| १५७ | ९८५ | ०.५८ % | ५७०.३७ |
| १५८ | ९९० | ०.५८ % | ५७२.०६ |
| १५९ | ९९५ | ०.५८ % | ५७३.७५ |
| १६० | १००० | ०.५८ % | ५७५.४५ |
| १६१ | १००५ | ०.५७ % | ५७७.१४ |
| १६२ | १०१० | ०.५७ % | ५७८.८३ |
| १६३ | १०१५ | ०.५७ % | ५८०.५२ |

| अ. क्र. | प्रकल्प किंमत (रु. कोटी) | अनुज्ञेय प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क (%) | अनुज्ञेय प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क रक्कम (रु. लक्ष) |
|---|---|---|---|
| १६४ | १०२० | ०.५७ % | ५८२.२१ |
| १६५ | १०२५ | ०.५७ % | ५८३.९० |
| १६६ | १०३० | ०.५७ % | ५८५.५९ |
| १६७ | १०३५ | ०.५७ % | ५८७.२९ |
| १६८ | १०४० | ०.५७ % | ५८८.९८ |
| १६९ | १०४५ | ०.५७ % | ५९०.६७ |
| १७० | १०५० | ०.५६ % | ५९२.३६ |

*****